Knowledgeable Research (KR) 2026, Special Vol., (5):03
ISSN: 2583-6633, CODEN: KRABAU
International open-access peer-reviewed refereed monthly journal
https://knowledgeableresearch.com/index.php/1

# कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे वाचन संस्कृतीत होणारे बदल

[1]डॉ. भागवत एन. पस्तापुरे*
संशोधक मार्गदर्शक

[2]पार्वती प्रभाकर वाघमारे
संशोधक
भूगोल विभाग, इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय सिडको, नांदेड

**शोध सार**

*प्रस्तुत शोध पत्रिका लिहिण्याचा मुख्य उद्देश हा पूर्वीची वाचन संस्कृती व सद्याच्या काळातील वाचन संस्कृती यामध्ये कृत्रिम बुद्धीमत्तेमुळे काय बदल झालेले आहेत यांचा अभ्यास करणे होय. कृतीम बुद्धिमत्ता अर्थात आर्टीफिसियाल इंटेलिजन्स (AI) आजच्या काळातील सर्वात परिवर्तनशील तंत्रज्ञानापैकी एक आहे. हे आपले जीवन, कार्यपध्दती आणि संवाद साधण्याची पद्धत बदलत आहे. त्याचप्रमाणे एआय मुळे वाचनाची पद्धत अर्थात संस्कृतीही बदलत आहे. कारण एआय हे मानवाप्रमाणे समस्या सोडवणे, निर्णय क्षमता, तर्कसंगतता व नवीन गोष्टी शिकवण्याचे काम करत आहे. यासाठीच प्रस्तुत शोध निबंधात कृतीम बुद्धिमत्ता हे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून पूर्वीच्या काळातील वाचन संस्कृती व सध्याच्या काळातील वाचन संस्कृती यामध्ये काय काय बदल होत आहेत किंवा झालेले आहेत हाच मुख्य उद्देश या शोध पत्रिकेचा अभ्यास विषय असून कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे सध्याच्या काळात झटपट वाचन संस्कृती विकसित होत असलेली दिसून येते. परंतु एआय मुळे काही सकारात्मक व नकारात्म बदल अशा दोन्हीही पद्धतीने बदल झालेला आहे हे खालील मुद्याच्या आधारे थोडक्यात अभ्यासण्यात आले आहे. हा बदल म्हणजे अत्यंत परिणामकारक आहे. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण सखोल वाचन संस्कृती ही वेगवेगळ्या तंत्रज्ञानाचा वापरामुळे लोप पावत चाललेली दिसून येत आहे. एखाद्या गोष्टीचा सखोल अभ्यास करून ती समजून घेण्यासाठी पुस्तके आणि ग्रंथसंपदा याचे सखोल वाचन करणे आवश्यक असते..*

**बीज शब्द:** *वाचन संस्कृती, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, वाचन संस्कृतीतील बदल.*

**Received: 02/12/2025**
**Accepted: 17/01/2026**
**Published: 31/01/2026**

***Corresponding Author:**
डॉ. भागवत एन. पस्तापुरे
**Email:** pastapurebhagwat@gmail.com

## वाचन संस्कृती:

वाचन संस्कृतीचे महत्त्व हे केवळ शालेय पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे इतक्यापुरतेच मर्यादित नसून ते आपल्या मानवी जिवानाच्या प्रत्येक पैलूमध्ये काम करत असते. यामुळे केवळ मानसिक विकास होत नाही तर तो आपल्या विचारसरणीला योग्य ती दिशा व कर देण्याचे काम करते. म्हणून मानवाने वाचन संस्कृतीला चालना देऊन एक सुशिक्षित समाज निर्माण करू शकतो. ज्यामुळे लोकांना स्वतःची कर्तव्ये व समाजामध्ये होत असलेले बदल स्वीकारण्यास सुलभ जाते.

वाचन संस्कृती (अभ्यास) हा मानवी जीवनातील एक महत्त्वाचा भाग असून यामुळे केवळ ज्ञान वाढत नाही तर मानवाला त्याचा दृष्टीकोन आणि विचार करण्याची क्षमता विकसित करण्याचे काम करत असते. कोणत्याही देशाच्या विकासासाठी अनेक गोष्टी कारणीभूत असतात. त्यातीलच एक सर्वात महत्त्वाची म्हणजे शिक्षणाची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची असते. शिक्षण म्हणजेच वाचन संस्कृती ही आपल्याला नवनवीन ज्ञान प्राप्त करून त्याचे अनुसरण सतत आपल्या आचरणात रुजवून ठेवण्यासाठी उपयोगी पडते. यामुळे आपला आत्मविश्वास, निर्णय घेण्याची क्षमता विकसित

करतो आणि समाजात सक्रीय भूमिका बजावण्यास प्रेरित करतो. व आपले वयक्तिक आणि सामाजिक जीवन सुधारते. वाचन केल्यामुळे मनामध्ये कल्पनाचे किंवा विचारांचे नवनवीन मार्ग उलघडत जाताना पहावयास मिळतात. ज्यामुळे मानव हा कुठल्याही क्षेत्रात जाऊन तेथील नवीन विचारसरणी व दृष्टीकोन समजून घेऊ शकतो. हे फक्त सखोल वाचनसंकृतीमुळे शक्य आहे.

**तंत्रज्ञानाचा वापर:**

मागील काही काळापासून वाचन संस्कृतीच्या विकासात वेगवेगळ्या तंत्रज्ञानाचा वापर करून माहिती व तत्त्वज्ञानाविषयी ज्ञान माहिती करून घेण्यासाठी प्राचीन काळापासून विविध तंत्रज्ञानाचा आधार आपल्याला लाभलेला आहे. जसे की, वृत्तपत्र, मासिके, पुस्तके, ग्रंथ, वेगवेगळ्या संतांच्या तज्ञांच्या विचारसरणी इत्यादीचा समावेश प्राचीन काळात वापरण्यात आलेले तंत्र म्हणून संबोधता येईल. तर सध्याच्या काळात संगणक, इन्टरनेट, मोबाईल, ई-बुक्स, ऑडीओ बुक्स, ऑनलाइन लेख, ब्लॉग्स,सारांश आधारित मजकूर इ. लोकप्रिय झालेले तंत्रज्ञान पहावयास मिळते.

**कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर:**

यामध्ये पूर्वी वाचन म्हणजे प्रकाशित किंवा छापलेले पुस्तके आणि वर्तमान पत्रे, मासिके या तंत्रज्ञानाचा वापर होत असायचा. परंतु आता मात्र कृत्रीन बुद्धिमत्तेमुळे संगणक, इन्टरनेट, मोबाईल, ई-बुक्स, ऑडीओ बुक्स, ऑनलाइन लेख, ब्लॉग्स,सारांश आधारित मजकूर इ. तंत्रज्ञान अवगत झालेले आहे. यामुळे वाचन संस्कृती ही दीर्घकाळ राहिलेली नसून झटापट पद्धतीची झालेली आहे. एआय प्रणाली विकसित झाल्यापासून भाषांतर करणे, संक्षेप व मजकूर निर्माण करणे, अशा गोष्टी सहज आणि सोप्या झालेल्या आहेत. तसेच दृष्टिहीन लोकांसाठी ऑडीओ बुक्स, अभ्यासकासाठी संदर्भ शोध आणि विद्यार्थ्यांसाठी समजावून सांगणारे मजकूर उपलब्ध झाले आहेत. म्हणून वाचन संस्कृती ही अधिक सर्वसमावेशक झाली आहे.

**वाचन संस्कृतीत होणारा बदल:**

**१.नकारात्मक बदल (वाचन संस्कृतीवर दबाव)**

अ.सततचे विचलन होणे- कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे मोबाईल वरील सोशल मिडिया, गेम्स, व्हिडीओज यामुळे लोकांचे लक्ष वाचनापेक्षा इतर गोष्टींकडे जास्त जात आहे.

आ.झटापट माहितीची सवय- वाचक व शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी एआयशी निघाडीत असालेल्या चाट जीपीटीद्वारे झटपट व छोटासा मजकूर असलेली माहिती वाचन करत असल्याने

**दीर्घ वाचनाची सवय कमी झाली.**

इ.मुद्रित पुस्तकाचा घटता वापर- एआयमुळे तरुण पिढी इ-बुक्स, ऑडीओबुक्स, आणि पीडीएफवर अवलंबून राहिली आहे. यामुळे पारंपारिक पुस्तकाच आकर्षण कमी झाले आहे.

ई.खोलवर वाचनाची कमतरता- कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे मोबाईल वरील वाचन हे उथळ स्वरूपाचे असते. त्यामुळे साहित्य, कादंबऱ्या, निबंध याकडे लक्ष द्यायची प्रवृत्ती कमी होते.

**२.सकारात्मक बदल (वाचन संस्कृतीत नवी संधी)**

अ.डिजिटल वाचनाची सोय - कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे इ-बुक्स, ऑडीओबुक्स, न्यूज, एप्स, ब्लॉग्स व मोबाईलमुळे वाचन अधिक सुलभ झाले आहे.

आ.ज्ञानाचा विस्तार- इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या असंख्य लेख, संशोधन पत्रके, शैक्षणिक सामाग्रीमुळे ज्ञानप्राप्तीचे नवीन दरवाजे उघडले जातात.

इ.वाचनाला गती आणि सवय- वेगवेगळ्या एप्समुळे लोकांना वाचनाची सवय लागू शकते. अगदी प्रवासात किंवा थोड्या वेळातही पुस्तक वाचता येते.

ई.सामुहिक वाचनांचे नवे मंच – गुडरीड्स, गुगल बुक्स, व्होट्सअप, बुक क्लब्स यासारख्या डिजिटल माध्यमामुळे वाचकांच्या समुदायांना जोडले जात आहे.

**निष्कर्ष:**

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे वाचन संस्कृती नष्ट होत नसून ती रूपांतरित होत आहे. तंत्रज्ञानाचा संतुलित वापर करून सखोल, चिंतनशील आणि मूल्याधिष्ठित वाचन टिकवणे ही आजच्या काळातील गरज आहे.

**संदर्भ:**

१.http://www.academia.com.

२.http://www.mahatb.com.

३.http://www.languagemagazine.com.

४.www.vsnaikcollegelibraryraver.blogspot.com

५. http://www.marathisrushti.com.

६. http://www.lokmat.com.

७.http://www.lekhakmitra.com.

८. http://www.dainikprabhat.com.

Copyright: © The authors. This article is open access and licensed under the terms of the Creative Commons Attribution License (http://creativecommons.org/licenses/by/4.0/)